


# आदिवासी समाज :
## प्रश्न आणि आव्हाने

डॉ. जयश्री महाजन | प्रा. सागर बडगे

एकंदरीत जागतिकीकरण, खाजगीकरण इत्यादीतून संपूर्ण समाजच प्रभावित होत आहे. आदिवासींच्या विकासासाठी भारत सरकारकडून विविध योजना राबविल्या आहेत, राबविल्या जात आहेत, आधुनिकीकरणाचा संपर्क आदिवासींना होत आहे. आदिवासींच्या जीवनशैलीत, स्थितीत परिवर्तन घडवून आणण्याचाही प्रयत्न होत आहे. अशा स्थितीत मूळ आदिवासी समाजाची जीवनशैली कशी होती, त्यांचे धार्मिक, सामाजिक जीवन कसे होते. त्यांचे सांस्कृतिक जीवन काय होते, याची ओळख नव्याने करुन घेण्याचा आमचा हा प्रयत्न. त्याचबरोबर बदलत्या काळानुसार आदिवासी समाज संरचनेत, कार्यात, स्थितीत कोणते बदल झालेत, विकास योजनांचा त्यांच्यावर काय परिणाम झाला, आर्थिक व राजकीय क्षेत्रात त्यांची नेमकी स्थिती काय आहे? आदिवासी स्त्री जीवन कसे आहे? या वरील सर्व प्रश्नांची उकल करण्याचा प्रयत्न या ग्रंथात केलेला आहे.

•••



अथर्व पब्लिकेशन्स्
ऑनलाईन पुस्तक खरेदीकरिता...
www.atharvapublications.com

ISBN 978-93-86196-43-9

## अनुक्रमणिका


■ वन हक्क जमिनी व न्यायालयीन प्रक्रिया ............................ १३
डॉ.एल.पी. वाघ, जळगाव

■ आदिवासींच्या विकासात शासकीय योजनांचे अशापयश ............... १८
प्रा. डॉ. विठ्ठल जी. चव्हाण, देसाईगंज जि.गडचिरोली.

■ कॉमन सिव्हिल कोड आणि आदिवासी समाज ........................ २६
प्रा. डॉ. प्रदीप एच. गजभिये, मोवाड, जि. नागपूर

■ गोंड आदिवासी विधवा महिलांची आर्थिक व
कौटुंबिक समस्या एक अभ्यास ............................................ ३३
वसंत भाऊराव राठोड, गोकुंदा ता.किनवट

■ आदिवासी विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शैक्षणिक योजनांचे यशापयश ..... ३९
समाधान लोटन कुंभार, जळगाव

■ आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत अनुसूचित जमातीचे स्थान .................. ४९
डॉ. बी.एल. म्हस्के, जालना

■ महाराष्ट्रातील आदिवासींच्या आर्थिक आणि सामाजिक समस्या ........ ५७
प्रा.डॉ. नवनाथ शिंदे, जालना

■ मुद्रा व बाजार आधारित अर्थव्यवस्थेचा दबाव आणि
आदिवासी अर्थ व सामाजिक व्यवस्थेतील स्थित्यंतरे .................... ५९
प्रदीप मेश्राम, भंडारा

■ आंध आदिवासी जमातीचे समाजशास्त्रीय अध्ययन ........................ ६७
प्रा. डॉ. आनंदा भिकुजी काळे , अकोला
प्रा. महेंद्र भिमराव भगत , अकोला

■ जळगांव शहरातील आदिवासी मुलींच्या शासकीय
वसतिगृहातील सोयी-सुविधांचा अभ्यास ................................ ७३
सौ. सुवर्णा भारत कऱ्हाड, जळगाव

# आदिवासींच्या विकासात शासकीय योजनांचे अशापयश

**प्रा. डॉ. विठ्ठल जी. चव्हाण**
आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय, देसाईगंज (वडसा) जि.गडचिरोली.

**प्रस्तावना** :-भारतात विविध जाती, जमाती, विविध पंथ, विविध भाषा, बोलीभाषा, बोलणारे लोक आढळून येतात. विविधता हे भारतीय समाजाचे एक महत्त्वाचे अंग आहे. भारत हा विकसनशील देश आहे. या देशाची २१ व्या शतकाकडे वाटचाल सुरू असून देशाला स्वातंत्र्य मिळून ७० वर्षे पूर्ण होत आहे. या काळात भारताने अनेक क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती केली. पण अनुसूचित, जाती, जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमातींचा पाहिजे, त्या प्रमाणात विकास किंवा प्रगती अजूनही झालेली दिसून येत नाही. परंतू अनुसूचित जाती, जमातीच्या विकासासाठी केंद्र व राज्य सरकार सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. आदिवासी समाजाच्या विकासासाठी किंवा कल्याणासाठी आतापर्यंतच्या पंचवार्षिक योजनेतून आदिवासींचा किती विकास झाला हा संशोधनाचा विषय आहे.

**आदिवासींचे जीवन** :- अनूसुचीत जमातीमध्ये आदिवासी हे सर्वात मागासलेले आहेत. साधे जीवन जगणारे, जंगलात राहणारे, व जंगलाचे राजे म्हणून ओळखले जाणारे आदिवासी लोकांचे जीवन अतिशय निम्न दर्जाचे असून अन्न, वस्त्र, निवारा या गरजाची पूर्तता सुध्दा त्यांच्याकडून पूर्ण होत नाही.

आदिवासी समाज संपूर्ण भारतात विखुरलेला आहे. २००१च्या जनगणनेनुसार भारतामध्ये आदिम जमातीची संख्या ५०० पेक्षा जास्त आहे. आदिवासींची एकूण लोकसंख्या ८.४ कोटी आहे. आदिवासी समाज अतिदुर्गम भागात डोंगराळ प्रदेशात आणि घनदाट जंगलात वास्तव्य करीत आहे. त्यामुळे हा समाज मागासलेला, अशिक्षित साधे जीवन जगणारा व जंगलात राहणारे आहे. पूर्वी जंगलाचे राजे म्हणून ओळखले जाणारा आदिवासी लोकांचे जीवनमान अतिशय निम्न दर्जाचे असून अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, अरोग्य या मूलभूत गरजांची पूर्तता सुध्दा व्यवस्थितपणे होत नाही. यासंदर्भात गिलीन आणि गिलीन व्याख्या करताना असे म्हणतात की, ''आदिवासी समाज हा एका विशिष्ट भूप्रदेशावर वास्तव्य, एक समान बोली भाषा बोलणारा, समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षराची ओळख नसलेल्या स्थानिक गटाचे एकत्रीकरण होय''